| पुणे पोलीस | वाहतुक शाखा, पुणे शहर<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे | PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./१३६९/२०२४ दिनांक :-१९ /०२/२०२४

## प्रेसनोट

पुणे शहरात मोठया प्रमाणात वाहनांचे संख्येमध्ये झालेली वाढ आणि विविध मोठे प्रकल्प (मेट्रो, उड्डाणपूल, विविध विकासकामे) सुरु असल्यामुळे तसेच अवजड वाहनांमुळे रस्त्यावरील जागा मोठया प्रमाणावर व्यापली जाऊन वाहतूकीस अडथळा निर्माण होतो. यामुळे नागरिकांना मोठा धोका व गैरसोय होते.

त्याकरिता जनतेस पोहचणारा धोका, अडथळा आणि गैरसोय टाळण्यासाठी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन मी शशिकांत बोराटे, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पुणे शहर, जड वाहनांचे वाहतूकीसंदर्भात तात्पुरत्या स्वरुपात प्रायोगीक तत्वावर खालीलप्रमाणे नव्याने आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी सदर ठिकाणी असलेले वाहतूकीचे असलेले निर्बध रद्द करण्यात येत आहेत.

- **पुणे शहरातील खालील नमुद ठिकाणी / रस्त्यावर, तसेच या मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या इतर अंतर्गत रस्त्यांवर नमुद वेळेत सर्व प्रकारच्या जड, अवजड, मंदगती (डंपर, आर.एम.सी. मिक्सर, जे.सी.बी., रोड रोलर व इतर तत्सम वाहने) वाहनांची वाहतूक तसेच पार्किंग करणेस बंदी करण्यात येत आहे. (अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, पी.एम.पी.एम.एल. व खाजगी बसेस इ. खेरीज करून)**
- 

| अक्र | रस्त्याचे नाव | जड वाहतूक बंदीचे रस्ते / ठिकाण व जड वाहतूक बंदीची वेळ |
|---|---|---|
| १ | पुणे नगर रोड | वाघेश्वर चौक, वाघोली ते खराडी बायपास (०७.०० ते १०.०० व १७.०० ते २१.०० ) |
| २ | केसनंद रोड | वाघोली ते शिवाजी चौक केसनंद गांव (०७.०० ते १०.०० व १७.०० ते २१.०० ) |
| ३ | लोहगांव वाघोली रोड | लोहगांव चौक, वाघोली ते लोहगांव ते धानोरी मार्गे विश्रांतवाडी (०७.०० ते १०.०० व १७.०० ते २१.०० ) |
| ४ | पुणे नगर रोड | वाघेश्वर चौक, वाघोली ते लोणीकंद (०७.०० ते १०.०० व १७.०० ते २१.०० ) |
| ५ | लोहगांव रोड | लोहगाव ते पेट्रोलसाठा चौक ते विश्रांतवाडी (०८.०० ते २३.०० ) |

तरी नागरिकांनी याबाबत आपल्या काही सूचना / हरकती असल्यास त्या पोलीस उप आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफिस, बंगला नं. ६, जेल रोड, पुणे ४११००६ यांचे कार्यालयात दि.२०/ ०२/२०२४ ते दि. ०५/ ०३ /२०२४ पर्यंत लेखी स्वरुपात कळवाव्यात. नागरिकांच्या सूचना व हरकतींचा विचार करुन अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतील.

19.2.24

(शशिकांत बोराटे)
पोलीस उप-आयुक्त,वाहतूक
पुणे शहर.